ज्ञान प्रबोधिनी प्रशाला
पुणे
आवक क्र. ८८६
नों. ३० आ...
दिनांक २९।७।८३
तारीखी क्र.

महाराष्ट्र शासन
क्रमांक: व्हिएलएस १०८२/५८७५१/[११४]
प्राशि-३
शिक्षण व सेवा योजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक १८ जुलै, १९८३.

प्रति,
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय :- ज्ञान प्रबोधिनी, पुणे
मराठी शाळेस परवानगी

पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण, पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी, या खाजगी संस्थेच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस "बाल बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींवर शासन मंजूरी देत आहे:-

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने सदर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस. एस. सी. डी. एड. ] नेमलाच पाहिजे व त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वतःची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

८. शाळेच्या फीचे दर शासनाने विहित केल्याप्रमाणे असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

९. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.



खरी प्रत

शिक्षण उप संचालक
पुणे विभाग, पुणे-१

Attested by me
9/10/89
Science Consultant
Dy. Director of Education
Pune Region Pune 1.

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला
पुणे
आवक क्र.
नोंद
दिनांक

१०. नियमानुसार अनुसूचित जाती जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण भरणे आवश्यक आहे.

२. आपणांस विनंती आहे की, वरील अटींची पूर्तता झाल्यानंतरच या प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व आपल्या कार्यपूर्ततेचा अहवाल शासनास यथावकाश पाठवावा.

[ बं० कॉं० व्यवहारे ]
सहाय्यक सचिव.

वा.ना. अभ्यंकर
आषाढ ३०, २०३९

प्रत:

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
सचिव, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे २०
यांचेकडे माहितीसाठी आणि नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

Attested by
9/10/89